ठाणे, सोमवार दि. २९ जुलै २०२४ वर्ष : १३, अंक : ९१ पाने : ६, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

वर्धापनदिन
१३ वर्षांची यशस्वी घोडदौड

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच ! ®

दैनिक
# महाराष्ट्र सम्राट

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर आणि पुणे येथून प्रसिद्ध संपादक : चंद्रकांत भोईटे

अग्रलेख
**लोकांची हतबलता**

सर्वसामान्य माणूस हा लोकशाहीचा मुख्य घटक आहे. यामध्ये सर्व सामान्य माणसाने राजकीय परिस्थितीवर बोलणे अपेक्षित असते. असा राजकीय परिस्थितीवर भाष्य करणारा मध्यमवर्गीय माणूस सध्या दुर्मिळ झाला आहे.

......पान ४ वर



प्रो गोविंदा सीझन २ ची पूर्व पात्रता फेरी म्यॅस्टिक संटर येथे संपन्न

......पान ४ वर

# विधान परिषदेच्या नवनिर्वाचित सदस्यांनी घेतली शपथ...



मुंबई : मागील काही दिवसांपूर्वी विधानपरिषद निवडणुकीच्या पार पडल्या. यामध्ये निवडून आलेल्या नवनिर्वाचित सर्व ११ आमदारांचा शपथविधी सोहळा आज संपन्न झाला. विधान परिषदेमध्ये या सर्व आमदारांनी शपथ घेतली. यामध्ये भाजप नेत्या पंकजा मुंडे यांच्यासह सदाभाऊ खोत यांनी शपथ घेतली आहे. विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी नवनिर्वाचित सदस्यांना शपथ दिली. यावेळी विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे हेदेखील उपस्थित होते. भाजप नेत्यांकडून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला आहे.

विधानपरिषदेच्या ११ जागांसाठी निवडणूक पार पडली. ११ जागांसाठी १२ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते. यामध्ये महायुतीने बाजी मारल्यानंतर शरद पवार गटाचे पुरस्कृत शेकपाचे जयंत पाटील पराभूत झाले. महायुतीचे ९ उमेदवार विजयी झाले. तर महाविकास आघाडीचे २ उमेदवार निवडणूक आले होते. काँग्रेस पक्षाची मतं फुटल्यामुळे महायुतीचे उमेदवार विजयी झाले. या सर्व नवनिर्वाचित आमदारांचा शपथविधी सोहळा पार पडला.

### कोणकोणत्या उमेदवारांनी घेतली शपथ

१.पंकजा मुंडे – भाजप
२. योगेश टिळेकर – भाजप
३. अमित गोरखे – भाजप
४. परिणय फुके – भाजप
५. सदाभाऊ खोत – भाजप
६. भावना गवळी – शिंदे शिवसेना
७. कृपाल तुमाने – शिंदे शिवसेना
८. शिवाजी गर्जे – राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष
९. राजेश विटेकर – राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष
१०.प्रज्ञा सातव – काँग्रेस
११. मिलिंद नार्वेकर – उद्धव ठाकरे पक्ष

# गणेशोत्सवात मिळणार आनंदाचा शिधा

**राज्यातील नागरिकांसाठी गौरी–गणपती सणानिमित्त सरकारकडून आनंदाच शिधा मिळणार आहे. राज्यातील १ कोटी ७० लाख ८२ हजार ८६ शिधापत्रिकाधारकांना आनंदाचा शिधा वितरीत करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.**

यंदाच्या गौरी–गणपती उत्सवानिमित्त प्रत्येकी एक किलो या परिमाणात रवा, चना डाळ, साखर व १ लिटर सोयाबीन तेल या शिधाजिन्नसांचा समावेश असलेला 'आनंदाचा शिधा' प्रतिशिधापत्रिका १ शिधाजिन्नस वितरित करण्याचा निर्णय राज्याच्या पुरवठा विभागाने घेतला आहे.

यंदाच्या गौरी गणपती उत्सवानिमित्त राज्यातील १ कोटी ७० लाख ८२ हजार ८६ शिधापत्रिकाधारकांना आनंदाचा शिधा वितरीत करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. प्रती संच १०० रुपये या सवलतीच्या दराने मिळणाऱ्या या आनंदाचा शिधा संचामध्ये प्रत्येकी एक किलो रवा, चणाडाळ, साखर आणि एक लिटर सोयाबीन तेल या शिधा जिन्नसांचा समावेश असणार आहे. आनंदाचा शिधा संच्याचे वाटप दि १५ ऑगस्ट २०२४ ते १५ सप्टेंबर २०२४ या कालावधीत करण्यात येणार आहे.

राज्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत अन्न योजना व प्राधान्य कुटुंब शिधापत्रिका धारक तसेच छत्रपती संभाजीनगर व अमरावती विभागातील सर्व जिल्हे, नागपूर विभागातील वर्धा या १४ शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यातील दारिद्र्य रेषेवरील (एपीएल) केशरी शिधापत्रिका धारक शेतकरी यांना या आनंदाचा शिधा मिळणार आहे.

प्रती शिधापत्रिका एक शिधा जिन्नस संचाची खरेदी करण्यासाठी ५६२.५१ कोटी इतक्या खर्चास मान्यता देण्यात आली आहे. या संचाचे वाटप ई–पॉस प्रणालीद्वारे करण्यात येणार आहे.

# सी. पी. राधाकृष्णन महाराष्ट्राचे नवे राज्यपाल



मुंबई – सी.पी. राधाकृष्णन यांची महाराष्ट्राचे नवीन राज्यपाल म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. रमेश बैस यांच्याजागी राधाकृष्णन यांची नियुक्ती करण्यात आली आहे. याआधी ते झारखंडचे राज्यपाल होते. दरम्यान, राज्यात विधानसभा निवडणुकांची तयारी सुरु आहे. अशातच राधाकृष्णन यांची राज्यपाल म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

### कोणत्या राज्यात कोण नवीन राज्यपाल ?

- हरिभाऊ किसनराव बागडे यांची राजस्थानचे राज्यपाल म्हणून नियुक्ती
- जिष्णू देव वर्मा यांची तेलंगणाचे राज्यपाल म्हणून नियुक्ती
- ओम प्रकाश माथूर यांची सिक्कीमचे राज्यपाल म्हणून नियुक्ती
- संतोष कुमार गंगवार यांची झारखंडचे राज्यपाल म्हणून नियुक्ती
- रामेन डेका यांची छत्तीसगडचे राज्यपाल म्हणून नियुक्ती
- सी एच विजयशंकर यांची मेघालयचे राज्यपाल म्हणून नियुक्ती
- सी. पी. राधाकृष्णन महाराष्ट्राचे राज्यपाल म्हणून नियुक्ती
- आसामचे राज्यपाल श्री गुलाब चंद कटारिया यांची पंजाबचे राज्यपाल म्हणून नियुक्ती. चंदीगडच्या केंद्रशासित प्रदेशाचे प्रशासक म्हणूनही नियुक्ती करण्यात आली आहे.
- सिक्कीमचे राज्यपाल लक्ष्मण प्रसाद आचार्य यांची आसामच्या राज्यपालपदी नियुक्ती केली आहे. त्यांच्याकडे मणिपूरच्या राज्यपालपदाचा अतिरिक्त कार्यभारही देण्यात आला आहे.

### सीपी राधाकृष्णन दोन वेळा खासदार

सीपी राधाकृष्णन हे दीर्घकाळापासून भाजपचे सदस्य आहेत. लहान वयातच ते भारतीय जनसंघाचे सदस्य झाले होते. यावेळी त्यांचे वय १७.५ वर्ष होते. सीपी राधाकृष्णन हे देखील दोन वेळा लोकसभेचे सदस्य राहिले आहेत. १९९८ आणि १९९९ च्या सार्वत्रिक निवडणुका त्यांनी भाजपच्या तिकिटावर जिंकल्या. पण २००४, २०१२ आणि २०१९ मध्ये त्यांचा पराभव झाला. तामिळनाडूच्या कोईम्बतूर लोकसभा मतदारसंघातून ते दोनदा खासदार म्हणून निवडून आले होते. तामिळनाडूमध्ये भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष राहिले आहेत.

### सीपी राधाकृष्णन यांना खेळाचीही आवड

सीपी राधाकृष्णन यांना खेळाची खूप आवड आहे. त्यांना टेबल टेनिस, क्रिकेट आणि व्हॉलिबॉल या खेळांची आवड आहे. महाविद्यालयीन जीवनात त्यांचं टेबल टेनिस आणि धावण्यात विशेष प्राविण्य होतं. १९७८ मध्ये त्यांनी मदुराई विद्यापीठामधून बीबीएचं शिक्षण घेतलं होतं. तसेच राज्यशास्त्रात त्यांनी पीएचडी देखील केली आहे.







### नवी मुंबई पालिकेच्या मदतकार्य पथकाने केलेल्या

# स्वच्छता कार्याचे पुणे पूरग्रस्तांकडून प्रशंसात्मक आभार

नवी मुंबई : पुणे शहर व परिसरात अतिवृष्टीतील पूर परिस्थितीमुळे ओढवलेल्या अडचणीच्या स्थितीत पूर ओसरल्यानंतर तेथील पूरग्रस्त नागरिकांच्या मदतीकरिता महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री ना.श्री.एकनाथ शिंदे यांच्या निर्देशानुसार महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली नवी मुंबई महानगरपालिकेचे मदतकार्य पथक धावून गेले आहे. नेहमीच इतरांच्या मदतीसाठी सज्ज असणा-या नवी मुंबई महानगरपालिकेच्या पथकाने सिंहगड रोड एकतानगरी परिसरात केलेल्या स्वच्छता कार्याचे तेथील लोकप्रतिनिधींसह नागरिकांनी मनापासून कौतुक करीत आभार मानले आहेत.

पुणे येथे ओढवलेल्या पूर परिस्थितीमुळे तेथील अनेक भागातील रस्त्यांवर तसेच घरातही गाळ आणि कचरा मोठ्या प्रमाणात जमा झाला होता. त्याचा परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होणार असल्याचे लक्षात घेत जलद स्वच्छता करणे महत्वाचे होते. या अनुषंगाने मुख्यमंत्री महोदयांच्या निर्देशानुसार, आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ. अजय गडदे यांनी लगेच महानगरपालिकेचे ११५ जणांचे पथक तयार केले व त्यांना २ जेटींग मशीन व आवश्यक स्वच्छता साधनांसह शनिवारी सकाळी एनएमएमटीच्या २ बसेसने पुण्याकडे रवाना केले.

त्याठिकाणी पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत नमुंमपा मदतकार्य पथकास सिंहगड रोड परिसरातील एकतानगरी हा पूरग्रस्त भागात साफसफाई करण्याचे सूचित करण्यात आले. त्या अनुषंगाने उपमुख्य स्वच्छता अधिकारी राजेंद्र इंगळे व स्वच्छता अधिकारी विजय पडघन यांनी तेथील परिस्थितीचा आढावा घेत आपले सहकारी स्वच्छता निरीक्षक सर्वश्री विजय नाईक, नितीन महाले, नवनाथ ठोंबरे व विजय काळे यांच्यासह साफसफाई कामाचे नियोजन केले व सोबतच्या २ स्वच्छता पर्यवेक्षक आणि १०० हून अधिक स्वच्छताकर्मींसह तेथील परिसरात व घरांतील स्वच्छतेत महत्वपूर्ण योगदान दिले. त्या परिसरात रोगराई पसरू नये म्हणून सोबत नेलेल्या जंतुनाशक पावडरही त्याठिकाणी फवारण्यात आली.

या पथकाने ज्या आत्मियतेने स्वयंस्फुर्तीने काम केले त्याची प्रशंसा तेथील माजी नगरसेविका श्रीम. मंजुषा नागपुरे तसेच त्या परिसरातील नागरिकांनी केलेली असून नवी मुंबई महानगरपालिकेचे आभार व्यक्त केलेले आहेत. नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्राची स्वच्छता राखतानाच इतर शहरांच्या अडचणीच्या काळात नवी मुंबई महानगरपालिका नेहमीच धावून गेली असून पुणे येथील पूरग्रस्तांना केलेल्या मदतीची तेथील नागरिकांप्रमाणेच पुणे महानगरपालिकेकडूनही आभार व्यक्त करीत दखल घेण्यात आलेली आहे.





### ऐरोली खाडीकिनारा स्वच्छ करत लोकसहभागातून

## खारफुटी पर्यावरणशील संवर्धन दिन साजरा




नवी मुंबई : 'खारफुटीच्या पर्यावरणशील संवर्धनासाठी आंतरराष्ट्रीय दिन' युनेस्कोने जाहीर केल्याप्रमाणे २६ जुलै रोजी जगभरात साजरा होत असून नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीनेही ऐरोली सेक्टर १० येथील खाडीकिनारी विद्यार्थी व नागरिकांच्या सहयोगातून खारफुटीच्या संरक्षण संवर्धनाकरिता खाडीकिनारा स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छ सर्वेक्षण २०२४ अंतर्गत सफाई अपनाओ बिमारी भगाओ अभियानांतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येत असून माझी वसुंधरा अभियानाचेही विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्राला विस्तृत असा खाडीकिनारा लाभला असून त्याची स्वच्छता रहावी व त्याचा उपयोग खाडीकिना-यांच्या पर्यावरण संरक्षणाला व्हावा या भूमिकेतून ही विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ. अजय गडदे, परिमंडळ २ चे उपआयुक्त डॉ. कैलास गायकवाड यांच्या नियंत्रणाखाली ही मोहीम राबविण्यात आली असून ऐरोलीचे विभाग अधिकारी तथा सहा. आयुक्त अशोक अहिरे, मुख्य स्वच्छता अधिकारी श्री. सतिश सनदी व उप मुख्य स्वच्छता अधिकारी राजेंद्र इंगळे यांच्या माध्यमातून या विशेष स्वच्छता मोहीमेचे आयोजन करण्यात आले होते.

यामध्ये महानगरपालिकेचे स्वच्छता निरीक्षक, विभागातील अधिकारी, कर्मचारी, स्वच्छतामित्र यांचेसह वनशक्ती स्वयंसेवी संस्थेचे प्रमुख श्री.विकी पाटील व त्यांचे सहकारी तसेच घाटकोपर येथील झुनझुनवाला महाविद्यालयाचे एनएसएस विद्यार्थी, शिक्षक यांनी उत्स्फुर्त सहभाग घेतला.

## जिल्ह्यातील ८ तलाव गाळमुक्त

ठाणे : ठाणे जिल्ह्यातील जलस्त्रोतांचे बळकटीकरण करण्यासाठी 'गाळमुक्त धरण आणि गाळयुक्त शिवार योजना' राबविण्याचे काम जिल्हा परिषदेच्या लघु पाटबंधारे विभागामार्फत मागील वर्षापासून करण्यात येत आहे. सन २०२४ व २०२५ या वर्षात मुरबाड, शहापूर, अंबरनाथ, भिवंडी व कल्याण या पाच तालुक्यात पाझर तलाव व गाव तलावाचे एकूण ५० तलाव गाळमुक्त करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

जून २०२४ पुर्वी जिल्ह्यातील एकूण ८ तलावातील गाळ २२ हजार ०५० क्युबिक मीटर गाळ काढण्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे. या ८ तलावातील पाणीसाठा दोन कोटी २० लाख ५० हजार लिटरने वाढ झाली आहे. तसेच जिल्ह्यातील ४२ गाव तलाव व पाझर तलावांची काम मार्च २०२५ अखेरपर्यंत पूर्ण करण्यात येईल अशी माहिती लघुपाटबंधारे विभागाने दिली.

गाळमुक्त धरण आणि गाळयुक्त शिवार या योजनेअंतर्गत मुरबाड तालुक्यातील ५, कल्याण तालुक्यातील २, शहापूर तालुक्यातील १ अशी एकूण ८ काय जून २०२४ पुर्वी पूर्ण करण्यात आली आहेत.

मागील वर्षी जून २०२३ पूर्वी १६ कामे पूर्ण करण्यात आली असून ३६ हजार क्युबिक मीटर गाळ काढण्यात आला आहे. यामुळे या तलावांमध्ये ३ कोटी ६० लाख लिटर पाणीसाठा वाढला आहे- दिलीप जोकार, कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद ठाणे

ग्रामीण भागातील पाच तालुक्यात ६५ सिंचन व पाझर तलाव आहेत. लघुपाटबंधारे विभाग यांच्याकडील आजपर्यंतच्या आकडेवारीनुसार जिल्ह्यातील तलावाचे प्रकल्पिय पाणीसाठा क्षमता १८ हजार ४०७ स.घ.मी. असून सद्यस्थिती उपलब्ध पाणीसाठा १६ हजार ४८०स.घ.मी. आहे.





ठाणे शहर दैनिक पत्रकार संघाच्या वतीने आयोजित दहावी आणि बारावी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या ठाणे शहर दैनिक पत्रकार संघातील सभासदांच्या पाल्यांचा सत्कार ठाणे महापालिका मुख्यालयातील कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात आयोजित करण्यात आला होता. सदर प्रसंगी ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर नवनिर्वाचित खासदार नरेश म्हस्के यांचा सत्कार संघाच्या वतीने करण्यात आला. यावेळी ठाणे महानगरपालिकेने वितरित केलेल्या सदनिकांची एनओसी, संघाचे ओळखपत्र आणि मेडिक्लेम कार्डाचे वितरण ही यावेळी करण्यात आले. सदर प्रसंगी ठाणे महानगर पालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी, ठाणे शहर दैनिक पत्रकार संघाचे अध्यक्ष आनंद कांबळे, कार्याध्यक्ष विकास काटे, सरचिटणीस निलेश पानमंद, सहचिटणीस गणेश थोरात, खजिनदार विभव बिरवटकर, ज्येष्ठ पत्रकार मिलिंद बल्लाळ, ज्येष्ठ पत्रकार कैलास म्हापदी, पत्रकार संघाचे सदस्य अमर राजभर, सचिन देशमाने, अशोक गुप्ता,प्रफुल गांगुर्डे, पंकज रोडेकर व इतर मान्यवर पदाधिकारी ठाणे शहर दैनिक पत्रकार संघाचे सर्व सभासद बंधू भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. (छाया : मनोज सिंह)

# सुरतच्या धर्तीवर ट्राफिक व्यवस्था 'एनजीओ' कडे? केंद्रीय मंत्री नितीन गडकरींच्या जिल्हाधिकाऱ्यांना सूचना

मुंबई - सुरतमध्ये ट्राफिक व्यवस्था (ढीरषळल ारपरसशाशपीं) ही एनजीओ सांभाळते. त्या ठिकाणी जिल्हाधिकाऱ्यांच्या नेतृत्वात एक टीम जाऊन या सर्व व्यवस्थेचे अध्ययन करेल आणि त्यानंतर त्याचा अवलंब इतर शहरात करू, असे मत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी (छळींळप ऋरवज्ञरीळ) यांनी बोलताना व्यक्त केले आहे. नागपूर शहरात (छरसीीं छश्रु) रस्ते अपघात कमी करण्यासंदर्भात अपघात निवारण समितीची बैठक केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या उपस्थितीत पार पडली. यात शहरात होत असलेल्या हिट अँड रनच्या घटना असो, की ब्लॅक स्पॉटमुळे होणारे अपघात, हे रोखण्यासाठी उपाययोजनेच्या संदर्भात ही बैठक पार पडली. रविभवन येथील बैठकीत संबंधित उच्च पदस्थ अधिकारी, पोलीस आयुक्त, जिल्हाधिकारी यांच्यासह आरोग्य विभाग, नागपूरात वाहतूक जनजागृतीसाठी काम करणाऱ्या एनजीओचा सहभाग होता. यावेळी मंत्री नितीन गडकरी बोलत होते.

### देशात दरवर्षी ५ लाख लोकांचा रस्ते अपघात मृत्यू

नागपुरात ८०० ते १००० लोकांचा दरवर्षी अपघातात मृत्यू होतो. देशात दरवर्षी ५ लाख लोकांचा रस्ते अपघात मृत्यू होतो. या अपघातात मृत्यमुखी होणारे ६५% मृतक हे १८ ते ३४ वयोगटातील आहे. परिणामी, नागपूर शहरात होणारे अपघात आणि या अपघतांसाठी कारण ठरलेले ब्लॅक स्पॉट शोधले आहेत. तसेच त्यावर सध्या काम सुरू असल्याच समाधान केंद्रीय वाहतूक आणि परिवहन मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केले आहे.

### फुटपाथवरील अतिक्रमणवर कठोर कारवाई

या सोबतच शाळेसमोरील होणारे अपघात रोखण्यासाठीही काम सुरू असल्याचेही गडकरी म्हणाले. तर अतिक्रमणामुळे पायदळ चालणाऱ्यासोबत हिट अँड रन मध्ये मृत्यूचा घटना मोठ्या प्रमाणात घडत आहेत. त्यामुळे फुटपाथवरील अतिक्रमणवर कठोर कारवाई झाली पाहिजे, अशी मागणीही यावेळी करण्यात आली. जेव्हा कार आणि बस सारख्या वाहनांचा अपघात झाल्यास लोकांना वाहनचे पार्ट कापून काढावं लागतात.






ठाणे, सोमवार दि. २९ जुलै २०२४ वर्ष : १३, अंक : ९१ पाने : ६, किंमत : २ रुपये
Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

वर्धापनदिन
१३ वर्षांची यशस्वी घोडदौड

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच ! ®

दैनिक महाराष्ट्र सम्राट

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर आणि पुणे येथून प्रसिद्ध
संपादक : चंद्रकांत भोईटे



रेल्वे स्वच्छतागृह कंत्राटदाराकडून मुतारीसाठीही पैसे वसुली
...पान ५ वर

रस्ते दुरूस्तीची कामे सर्व प्राधिकरणाने युद्धपातळीवर पूर्ण करावीत : आयुक्त राव
...पान ५ वर



# मनू भाकरने इतिहास रचला

## पॅरिस ऑलिम्पिकमध्ये कांस्य पदकाला गवसणी

भारताच्या मनू भाकरने महिलांच्या १० मीटर एअर पिस्टलमध्ये कांस्य पदक पटकावलं आहे. पॅरिस ऑलिम्पिक २०२४ मध्ये भारताला हे पहिलं कांस्यपदक मिळालं आहे. भारतासाठी ऑलिम्पिकमध्ये पदक जिंकणारी मनू भाकर ही पहिली महिला नेमबाज आहे. कृष्णाने अर्जुनाला केवळ लक्ष्यावर ध्यान देण्यास सांगितलं होतं, तेच फायनलमध्ये माझ्या डोक्यात सुरू होतं, असं मनू भाकरने कांस्य पदक जिंकल्यानंतर सांगितलं.



### फायनलमध्ये मनू भाकरचा स्कोर

- पहिली ५ शॉट सीरीज: १०.६, १०.२, ९.५, १०.५, ९.६, एकूण ५०.४
- दुसरी ५ शॉट मालिका: १०.१, १०.३, ९.६, ९.६, १०.३, एकूण: ४९.९
- उर्वरित शॉट्स: १०.५, १०.४, ९.८, ९.८, ९.९, १०.२, १०.१, १०.२, १०.१, १०.०, १०.१,१०.३

### कोण आहे मनू भाकर ?

२२ वर्षांची मून भाकर ही मूळची हरियाणातल्या झज्जर तालुक्यातली आहे. मनू भाकरने आपल्या नेमबाजी करिअरमध्ये आतापर्यंत चांगली कामगिरी केली आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवरही तिने आपला ठसा उमटवलेला आहे.

### नेमबाजी विश्वचषकात मनू भाकरला नऊ सुवर्ण

जागतिक नेमबाजीत मनू भाकरनं आतापर्यंत दोन सांघिक पदकं मिळवलेली आहेत. तर नेमबाजी विश्वचषकात मनू भाकरला नऊ सुवर्ण आणि दोन रौप्य पदकं मिळालेली आहेत. मनू भाकरने राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धे तही वैयक्तिक सुवर्णपदक पटकावलेलं आहे. २०२२ साली मनू भाकरला एशियाडचं एक सांघिक सुवर्णपदक मिळालं होतं.



### पदक पटकावणारी पहिली महिला नेमबाज

### रमिता जिंदालचा १० मीटरच्या एअर रायफल स्पर्धेत अंतिम फेरीत प्रवेश

१० मीटर एअर रायफल महिला एकेरी स्पर्धेत भारताच्या रमिता जिंदालने इतिहास रचला आहे. रमितान जिंदालने अंतिम फेरीत प्रवेश मिळवला आहे. रमिता जिंदाल २०२४ च्या पॅरिस ऑलिम्पिकमध्ये अंतिम सामन्यात पोहचणारी तिसरी स्पर्धेक ठरली आहे. २० वर्षीय रमिता जिंदालने क्वालिफिकेशन राऊंडमध्ये ६३१.५ गुण मिळवून अंतिम सामन्यात प्रवेश केला. रमिता जिंदालने सहाही फेरीत १०० पेक्षा जास्त गुण मिळवले.

### सरबज्योत, अर्जुन यांची संधी हुकली

सरबज्योत सिंग आणि अर्जुन सिंह चीमा पुरुषांच्या १० मीटर एअर पिस्टलमध्ये अंतिम फेरीत स्थान मिळवू शकेल नाहीत. सरबज्योत पात्रता फेरीत ५७७ गुणांसह नवव्या स्थानावर, तर अर्जुन ५७४ गुणांसह १८व्या क्रमांकावर राहिला.

### कांस्य पदक जिंकल्यानंतर काय म्हणाली ?

मला खूप छान वाटतंय. मी यासाठी खूप मेहनत घेतली होती. कांस्य पदक जिंकले असले तरी मला आनंद आहे की मी देशासाठी जिंकू शकले. हे पदक सर्वांचं आहे. कृष्णाने अर्जुनाला केवळ लक्ष्यावर ध्यान देण्यास सांगितलं होतं, तेच फायनलमध्ये माझ्या डोक्यात सुरू होतं. कुटुंब, प्रशिक्षक आणि भारतीयांच्या पाठिंब्याबद्दल सर्वांचे आभार असं मनू भाकर म्हणाली. कांस्य पदक जिंकल्यानंतर मनू भाकरने सांगितले की, तिने भगवद्गीता वाचली होती आणि त्यातून प्रेरणा घेऊन ती पदक जिंकण्यात यशस्वी ठरली. मनू भाकर २०२० टोकियो ऑलिम्पिकमध्ये तिच्या पिस्तूलमध्ये तांत्रिक बिघाडामुळे पदक जिंकू शकली

# जेएनपीएच्या बंदरात कृषी मालाची साठवण यंत्रणा

पालघर : उरणनजीकच्या शेवा बंदराच्या परिसरातील २७ एकर जमिनीवर कृषी मालावर एकात्मिक पद्धतीने प्रक्रिया करून साठवणुकीची व्यवस्था पुरवणारे केंद्र उभारण्याचा निर्णय जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरणाने (जेएनपीए) घेतला आहे.

मोठ्या प्रमाणात दर्जेदार उत्पादन घेऊनही साठवणूक तसेच प्रक्रिया केंद्राची सुविधा नसल्यामुळे कृषी मालाची परदेशात विक्री न करू शकणाऱ्या शेतकऱ्यांना यामुळे दिलासा मिळणार आहे. अशा प्रकारचा हा देशातील पहिलाच प्रकल्प असणार आहे.

कृषी उत्पादनात भारत जागतिक पातळीवर दुसऱ्या स्थानी असला तरी उत्पादित होणाऱ्या कृषी मालापैकी जेमतेम अडीच टक्के मालाचीच निर्यात भारतातून होते. कृषी मालाच्या निर्यातीत जागतिक क्रमवारीत भारत आठव्या क्रमांकावर आहे. यामागे सर्वात मोठे कारण कृषी मालावर प्रक्रिया करणाऱ्या आणि (पान १२ वर) (पान १ वरून) मोठ्या प्रमाणावर त्याची साठवणूक करणाऱ्या केंद्रांची कमतरता हे आहे. या पार्श्वभूमीवर जेएनपीएतर्फे उभारण्यात येणारा हा प्रकल्प महत्त्वाचा ठरणार आहे. महाराष्ट्रासह मध्य प्रदेश, गुजरात, छत्तीसगड, उत्तर प्रदेशचा पश्चिम भाग, पंजाब, हरियाणा, हिमाचल प्रदेश, उत्तर कर्नाटक, तेलंगणा या राज्यांतील शेतकऱ्यांनादेखील या प्रकल्पाचा लाभ होणार आहे.

देशातील कृषी उत्पादन व निर्यातीचा तीन वर्षे सखोल अभ्यास करून अद्यायावत सोयीसुविधांनी सज्ज असलेला हा प्रकल्प सार्वजनिक खासगी भागीदारी तत्त्वावर चालवण्यात येणार आहे. यासाठी २८५ कोटी रुपयांच्या गुंतवणुकीतून शीतगृह, प्रक्रियागृह उभारण्यात येणार आहे. या ठिकाणी साठवण केंद्रासह प्राथमिक प्रक्रिया केंद्र, निर्यात मालाचे धुरीकरण, उत्पादनाचे एकत्रीकरण, दर्जानुसार निवड, पॅकिंग आदी सुविधा असणार आहेत. या प्रकल्पाची उभारणी एप्रिल २०२५ मध्ये सुरू होऊन सव्वा ते दीड वर्षाच्या कालावधीत प्रकल्प सुरू होण्याचे अपेक्षित आहे.

### साठवणूक केंद्राची वैशिष्ट्ये

- आंबा, द्राक्षे, डाळिंब, केळी, कांदा आदी कृषी मालांच्या साठवणुकीची व्यवस्था.
- मांस तसेच मत्स्य उत्पादनांच्या साठवणुकीचीही सोय.
- तांदूळ, मका, गहू, कडधान्ये साठवण्याचीही व्यवस्था.
- प्रति वर्ष १.२ दशलक्ष टन कृषी मालाची हाताळणी अपेक्षित.
- अत्याधुनिक नियंत्रण प्रणाली व साहित्य उपकरणांचा वापर.



केंद्रीय बंदरे, जहाजबांधणी व जलमार्ग मंत्रालयाच्या बंदराच्या माध्यमातून औद्योगिकीकरण करण्याच्या भूमिकेनुसार कृषीआधारित आयात-निर्यात मालावर प्रक्रिया व साठवणूक सुविधा विकसित करण्यात येत आहेत. कृषी मालाची नासाडी कमी करून त्याचा कालावधी वाढवणे, हा या प्रकल्पाचा प्राथमिक उद्देश आहे.

**– उन्मेश वाघ, अध्यक्ष, जेएनपीए**

# उरणमध्ये २२ वर्षीय तरुणीची निर्घृण हत्या

उरण : नवी मुंबईतील अक्षता म्हात्रे या तरुणीवर अत्याचार करून तिची हत्या झाल्याची घटना ताजी असतानाच नुकतेच उरणमध्ये एका तरुणीची निर्गुण हत्या करण्यात आली. उरण शहरात एन आय हायस्कूलच्या जवळ राहणारी यशश्री सुरेंद्र शिंदे (२२) ही २५ जुलै रोजी गुरुवारी सकाळी घरातून निघाली ती दुपारी दिडच्या सुमारास उरण बाझार पेठ येथे आढळून आली. मात्र त्या नंतर ती कुठेही दिसली नाही. मुलगी घरी न आल्याने तिच्या नातेवाईकांनी तिचा शोध घेतला. मात्र ती कुठेही आढळून आली नाही. त्यानंतर मुलगी हरवली किंवा बेपत्ता झाल्याचे लक्षात येताच ति च्या कुटुंबियांनी यशश्री शिंदे बेपत्ता असल्याची तक्रार उरण पोलिस ठाण्यात दाखल केली. पोलिस सूत्रांकडून मिळालेल्या वृत्तानुसार बेपत्ता असलेल्या तरुणीच्या शोधात असलेल्या उरण पोलिसांना २६ जुलै रोजी शुक्रवारी रात्रीच्या उरण तालुक्यातील कोटनाका येथील पेट्रोलपंप येथे एका तरुणीचा मृतावस्थेत शरीर आढळला. पोलिसांना मृतदेहची ओळख तात्काळ पटली असून,सदरचा मृतदेह पोलिसांकडून उरण येथील इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयात शव विच्छेदणासाठी नेण्यात आला.सदर मृतदेह बेपत्ता झालेल्या यशश्री शिंदे या तरुणीचा असल्याची तपासात निष्पन्न झाले आहे. या तरुणीच्या शरीरावर विविध ठिकाणी तिक्ष्ण हत्याराने वार करून तिची क्रूरतेने हत्या केल्याची बाब समोर आली आहे. सदर घटनेची माहिती व्हाटशॉप द्वारे सर्वत्र वाऱ्यासारखी पसरली आहे.

सदर घटणेबाबत सर्वच स्तरातून हळहळ व्यक्त करण्यात येत असून,तिव्र निषेध करण्यात येत आहे. शनिवार, २७ जुलै २०२४ रोजी सकाळी ८ वाजल्या पासून सर्वच राजकीय पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते, विविध सामाजिक संस्था संघटनांचे प्रतिनिधी सदस्य, विविध हिंदुत्ववादी संघटनेचे पदाधिकारी सदस्य, जागरूक नागरिकांनी इंदिरा गांधी ग्रामीण रुणालय येथे मोठ्ठी गर्दी केली होती. घडलेल्या घटनेचा सर्वांनीच जाहीर निषेध केला.यशश्री शिंदे या तरुणीच्या शरीरावर नाराधमाने विविध ठिकाणी वार आहेत.त्यामुळे सुरुवातीला तरुणीच्या मृतदेहची ओळख पटणे सुद्धा अवघड झाले होते.



### प्रेम प्रकरणातून हत्या झाल्याचा पोलिसांचा प्राथमिक अंदाज

सदर घटना प्रेम प्रकरणातून झाली असल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांकडून समोर आली आहे. यशश्री शिंदे हिचा खून कोणी केला ? यशश्री शिंदे हिचा खून कशासाठी करण्यात आला ? या सर्व प्रकरणाची सखोल चौकशी उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील व त्यांचे सहकारी करीत आहेत. या खुनातील आरोपीने तरुणीची हत्या करून उत्तरप्रदेशात पलायान केले असून,उरण पोलिस अवघ्या काही दिवसांच्या अवधीत आरोपीला जेरबंद करतील असा विश्वास उरण पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक राजेंद्र कोते यांनी व्यक्त केला आहे.

### नराधमाला फाशीची शिक्षा ठोठावण्याची जमावाची मागणी

उरणमध्ये लव्ह जिहादची प्रकरणे समोर येत असून या अशा प्रकरणात पोलिस प्रशासनाने त्वरित कडक कारवाई करावी अशी मागणी करण्यात येत आहे. यशश्री शिंदेच्या बाबतीत घडलेली घटना अंत्यत निर्दयी, क्रूर व निंदनीय असल्याने, मानव जातील काळिमा फासणारी घटना आहे. त्यामुळे सदर दोषी नराधम आरोपीला त्वरित फाशी व्हावी अशी मागणी यशश्रीच्या कुटुंबियांनी व संतप्त झालेल्या नागरिकांनी केली आहे. या घटनेचा निषेध व्यक्त करण्यासाठी उरण येथील इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयासमोर राजकीय, सामाजिकसह सर्वच स्तरातील नागरिकांसह महिलांनी मोठ्ठा जमाव केला होता .या घटनेने संपूर्ण उरण तालुक्यासह मोठ्या प्रमाणात हळहळ व्यक्त करण्यात येत असून,उरण शहरातील व्यापारी असोसिएशननेही या तरुणीच्या हत्येचा निषेध व्यक्त करीत संपूर्ण बाजारपेठ बंद ठेवण्यात आल्याने शहरात शुकसुकाट पसरला होता.

# शिळफाटा येथील महिलेवर सामूहिक अत्याचार आणि हत्येच्या घटनेचा खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालविण्यात येणार; मुख्यमंत्र्यांच्या सूचना

मुंबई - शिळफाटा येथील मंदिरात आश्रयासाठी गेलेल्या एका महिलेवर सामूहिक अत्याचार करून तिची हत्या केल्याच्या घटनेचा जलदगतीने तपास करण्यात येईल. याप्रकरणातील दोषींना कठोर शिक्षा होण्याच्या दृष्टीने लवकरात लवकर आरोपपत्र दाखल करुन हा खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालविण्यात यावा. तसेच या प्रकरणी विशेष सरकारी वकिल म्हणून ज्येष्ठ विधीज्ञ उज्ज्वल निकम यांची नियुक्ती करण्यात यावी, अशा सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज ठाणे, नवी मुंबई पोलीस आयुक्त आणि गृह विभागाचे प्रधान सचिव यांना दिल्या.

ही अत्यंत गंभीर घटना असून याप्रकरणी ठाणे आणि नवी मुंबई पोलीसांकडे एफआयआर दाखल करण्यात आला आहे. घटना शिळफाटा, ठाणे येथे घडली असून तेथील पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबरोबरच महिलेच्या आई-वडिलांच्या तक्रारीवरुन नवी मुंबई पोलीसांकडे ४९८ ए कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास चांगल्या पद्धतीने आणि जलदगतीने करण्यात यावा, अशा सूचना मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी दिल्या आहेत. महिलेवर सामूहिक अत्याचार आणि तिची हत्या करणाऱ्या दोषींना कठोरात कठोर शिक्षा होण्याच्या दृष्टीने या प्रकरणी आरोपपत्र दाखल झाल्यानंतर हा खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालविण्यात येईल. तसेच या प्रकरणी विशेष सरकारी वकिल म्हणून ज्येष्ठ विधीज्ञ उज्ज्वल निकम यांची नियुक्ती करण्यात यावी, अशा सूचना मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी ठाणे पोलीस आयुक्त आणि गृह विभागाचे प्रधान सचिव यांना दिल्या आहेत. या प्रकरणातील दोषींना कठोरात कठोर शिक्षा होईल यादृष्टीने या प्रकरणी कार्यवाही करण्यात येईल, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

# कळव्यात रोमियो सराईत गुंडाचा हैदोस... मारहाण आणि घरात घुसून तोडफोड

### सोडविण्यास गेलेल्या महिला आणि लोकांनाही मारहाण

ठाणे (वार्ताहर) - ठाणे जिल्ह्यात शिळफाटा आणि नवीमुंबईतील अत्याचार आणि हत्या प्रकरण शमले नाही तोच कळव्यात रोडरोमियो सराईत गुंडाने हातात चाकू घेऊन दहशत पसरवीत मध्यस्थी करणाऱ्यांना महिलेला लाथाबुक्क्याने आणि इतर लोकांनाही मारहाण करणाऱ्या सराईत गुन्हेगार असलेल्या सनी उमेश तेलोरे या रोमियोंच्या विरोधात कळवा पोलीस ठाण्यात शुक्रवारी (ता-२६ जुलै) रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

तक्रारदार सुगंगा संतोष शिंदे(४४) राह. चाळ नं. २३, रूम नं. १८ महात्मा ज्योतीबा फुलेनगर, टीएमसी स्कुल बाजूला कळवा या ठिकाणी शुक्रवारी (ता-२६ जुलै) रोजी सायंकाळी घडला. तक्रारदार यांच्या १९ वर्षीय मुलाचे परिसरात राहणाऱ्या मुलीशी प्रेमसंबंध होते. याचाच राग मनात धरून सराईत गुन्हेगार सनी तेलोरे याचे नातेवाईक रानी तेलोरे हे तक्रारदाराशी नेहमीच भांडण करीत होते. या जाचाला कंटाळून तक्रारदार यांनी १९ वर्षीय मुलाला पनवेल येथे पाठविले. मात्र प्रेमसंबंध तुटले नाही. याचा राग मनात धरून सनी तेलोरे याने शुक्रवारी सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमर्स तक्रारदार यांच्या घरावर चाकू घेऊन पोहचला आणि दरवाजावर लाथा मारू लागला. तक्रारदार यांच्या मुलाला ठार मारणार अशी धमकी अवाच्र्या शिवीगाळ करीत होता.

मुलगा पनवेलला असल्याने सानी तेलोरे हा चाकुसह तक्रारदार यांच्या बहिणीच्या घरी माळ्यावर गेला. आणि घरात घुसून तोडफोड केली. त्यानंतर त्याला अडविणाऱ्या महिलेला लाथा बुक्क्याने मारहाण केली. त्यानंतर सोडविण्यास येणाऱ्या लोकांमध्ये चाकू फिरवून दहशत निर्माण व त्यांना मारहाण केली. परीसरातील मुले नामे राजशेखर वेखुरे व रोहित शिंदे या तरुणांनाही मारहाण केली. आरडाओरड केल्यानंतर लोक जमले तेव्हा सनी तेलोरे याने चाकूच्या धाकावर मी इथला डॉन आहे मध्ये पडल्यास ठार मारिन अशी धमकी दिली.

दरम्यान तक्रारदार यांनी आणि मारहाण झालेल्या लोकांनी पोलीस ठाण्यात धाव घेतली. तक्रारदार यांनी सनी उमेश तेलोरे याच्या विरोधात ठार मारण्याची धमकी, मारहाण आणि चाकूने दहशत पसरविणे अंतर्गत गुन्हा दाखल केला. कळवा पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# निती आयोगाच्या बैठकीत महाराष्ट्रातल्या पायाभूत प्रकल्पांवर चर्चा




नवी दिल्ली -आज झालेल्या निती आयोगाच्या बैठकीत महाराष्ट्रातील नाशिक पुणे रेल्वेमार्ग, चिपळुण कराड, ठाणे मेट्रो, मुंबई फनेल झोन, समुह विकास यासारख्या महत्वाच्या पायाभूत आणि विकास कामांच्या प्रकल्पांबाबत मुद्दे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मांडले. हे प्रकल्प वेळेत पूर्ण होण्यासाठी केंद्र सरकारने सहकार्य करण्याची विनंती मुख्यमंत्र्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे केली. राष्ट्रपती भवनात झालेल्या निती आयोगाच्या बैठकीत मुख्यमंत्री शिंदे यांनी राज्य शासनातर्फे सामान्य माणूस केंद्रबिंदू मानून घेतलेल्या योजनांविषयी माहिती दिली. हे सांगताना राज्यातील महत्वाच्या पायाभूत प्रकल्पांवरही प्रभावीपणे मुद्दे मांडले.

मुख्यमंत्री म्हणाले, क्लस्टर डेव्हलपमेंटच्या माध्यमातून मुंबई महानगर परिसर क्षेत्रातील तसेच राज्यातील इतर भागांमध्ये जुन्या आणि मोडकळीस आलेल्या इमारतींसाठी मोठ्या प्रमाणावर पुनर्विकास योजना सुरू केल्या आहेत. हा आशियातील सर्वात मोठा ब्राउनफील्ड प्रकल्प आहे. ही योजना आपल्या नागरिकांचे जीवनमान सुधारण्यासाठी उपयुक्त असल्याचे त्यांनी सांगितले. मुंबईतील झोपडपट्ट्या आणि मोडकळीस आलेल्या इमारतींचा पुनर्विकास राज्य सरकारच्या संस्थांमार्फत करण्यात येणार असून या संस्थांमार्फत दोन लाखांहून अधिक घरे बांधण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

राज्यात मोठ्या रस्ते प्रकल्पांमध्ये झपाट्याने सुधारणा होत असून कोकण कोस्टल रोड आणि कोकण ग्रीन फील्ड एक्स्प्रेस वे कोकणासाठी गेम चेंजर्स ठरणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. महाराष्ट्राच्या विविध भागांमध्ये अखंड कनेक्टिव्हिटीसाठी पाच हजार किलोमीटरचे ॲक्सेस कंट्रोल ग्रिड तयार करण्याची योजना असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. मुंबई महानगर परिसरात सुमारे सव्वा लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्चाच्या सुमारे ३९० किमी मेट्रो मार्गांचे बांधकाम सुरू असून पुणे आणि नागपूर येथे मेट्रो मार्गाचे कामही वेगाने सुरू आहे. नाशिक-पुणे रेल्वेमार्गाच्या कामाला तातडीने सुरू करण्याची मागणी मुख्यमंत्र्यांनी यावेळी केली.

बैठकीत मुंबईतील फनेल झोन संदर्भात तसेच उंचीची मर्यादा, रडार स्थलांतर करणे याबाबत चर्चा झाल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. बीपीटीच्या सहा एकर जागेचा चांगला वापर करून तेथे मरीन ड्राईव्ह सारखी चौपाटी विकसित करण्याबाबतही चर्चा झाल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

### नाशिक पुणे रेल्वेमार्ग, ठाणे मेट्रो, मुंबई फनेल झोन संदर्भात केंद्राने सहकार्य करावे- मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

वर्धापनदिन
दैनिक महाराष्ट्र सम्राट
१३ वर्षांची यशस्वी घोडदौड



# संपादकीय...



संपादक-चंद्रकांत भोईटे

## लोकांची हतबलता

सर्वसामान्य माणूस हा लोकशाहीचा मुख्य घटक आहे. यामध्ये सर्व सामान्य माणसाने राजकीय परिस्थितीवर बोलणे अपेक्षित असते. असा राजकीय परिस्थितीवर भाष्य करणारा मध्यमवर्गीय माणूस सध्या दुर्मिळ झाला आहे. याचे कारण म्हणजे राज्यघटनेची सातत्याने होणारी पायमल्ली तसेच राजकीय क्षेत्रातील हिन दर्शन होय. कारण देशात लोकशाही आहे; परंतु राज्यघटनेतील काही नियमांचा वापर करून आपल्या सोयीप्रमाणे राज्यकर्ते नियम वापरत आहेत असे दिसते. राज्यघटनेतील शुद्धतेचा आग्रह, त्यासंबंधीची कळकळ आणि काळजी कुणीच व्यक्त करत नाही, ही चिंताजनक बाब होय. या मूल्यांचा आग्रह धरणारे सत्याग्रही आहेत तरी कुठे असा प्रश्न पडावा ! याच्या एकदम विरुद्ध चित्र आपल्या स्वातंत्र्य चळवळीच्या काळात होते. १९व्या शतकात आपल्या देशात श्रीमंत लोक अगदी हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच होते. ते वगळता बाकी जनता गरीबच होती. परंतु सत्ताधाऱ्यांच्या चुकीच्या धोरणावर विरोधात सर्वसामान्य माणूस संघटितपणे आवाज उठवीत असे. सध्या महागाई, बेरोजगारी एवढी वाढली आहे. परंतु कोणताही राजकीय पक्ष किंवा संघटना सरकार विरोधात आंदोलने मोर्चा किंवा निषेध नोंदवण्यासाठी पुढे येत नाहीत ही विशेष बाब होय. देशातील सुशिक्षित वर्ग समाजावर होणाऱ्या अन्यायाबाबत किंवा सरकारच्या धोरणावर टीका करताना दिसत नाही हे देशाचे दुर्भाग्य म्हटले पाहिजे. तो अलिप्त असतो. सुशिक्षित युवकांमध्ये पत्रकार, वकील, बुद्धिवादी आहेत. परंतु सरकारच्या धोरणावर कोणीही बोलताना आढळत नाही तसेच सरकारमध्ये होत असलेल्या राजकीय अवमूल्यनावर कोणीही बोलताना दिसत नाही. असे होत असेल तर समाजाची प्रगती झाली हे कसे समजावे ? कारण समाजातील घटक काही बोलत नाहीत, याचाच अर्थ ते सर्व काही सहन करीत आहेत. समाजाची एवढी अधोगती कशी झाली याबाबत चिंता व्यक्त होत आहे. स्वातंत्र्यलढ्याचे नेतृत्व करणारे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे बहुतेक नेते मध्यमवर्गीय होते. जनतेत राष्ट्रीय चेतना पसरवणे, राष्ट्रीय मुक्ती चळवळीचे आयोजन करणे आणि शेवटी देशाला अन्याय -अत्याचारांपासून मुक्त करण्याचे श्रेय त्यांना दिले जाते. देश स्वतंत्र झाला, त्यानंतर विविध चळवळी झाल्या. या चळवळीतून देशाचा सांस्कृतिक, आर्थिक, सामाजिक विकास होऊ लागला. आजच्या काळात समाजात सुशिक्षित वर्गाची मोठी भर पडू लागली आहे. परंतु सत्ताधाऱ्यांच्या वर्तनावर किंवा वाढत्या महागाईवर सर्वसामान्य माणूस त्याचा आवाज व्यक्त करू शकत नाही, ही दु:खददायक बाब आहे. कारण लोकशाहीधिष्ठीत समाजरचनेत अन्यायाविरोधात आवाज उठवणे हे सर्वसामान्य माणसाचे काम आहे. परंतु सर्वसामान्य माणूस मूग गिळून गप्प बसतो, हे क्लेशकारक आहे. देशात विरोधी पक्षांना विचारले जात नाही. त्यांना न विचारताच कायदे केले जातात. या कायद्यांना सरकार लोकभावनेचा प्रक्षोभ पाहून स्थगिती देते, रद्द करते. शेतकरी तसेच कामगारांच्या लढ्यांबरोबरच स्वातंत्र्यासाठीचा लढा सुरू झाला. मध्यमवर्गीयांचे नेते आणि त्यांचे अनुयायी इतरांपेक्षा वेगळे ठरले ते त्यांच्या नि:स्वार्थपणामुळे. त्यांनी स्वत:साठी काहीही मागितले नाही, मागितले ते फक्त लोकांसाठी आणि तेही काय तर स्वातंत्र्य! परंतु स्वातंत्र्यानंतर राजकीय नेत्यांची स्वार्थी वृत्ती दरवेळी उघडपणे दिसू लागली आहे. या स्वार्थी वृत्तीमुळे अस्तित्वात असलेली राज्य सरकारे पाडण्याचा एककलमी कार्यक्रम केंद्रातील सत्ताधाऱ्यांकडून होत आहे. महाराष्ट्रातत महा विकास आघाडीचे सरकार सत्तेवर असताना त्यातील काही बंडखोरांनी भाजपशी हातमिळवणी करून नवीन सरकार स्थापन केले. यासोबतच राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी जे पूर्वी कायद्यात बसत नव्हते ते काम केले आणि विधानसभेच्या सभापतींची निवडणूक रद्द केल्याचा निर्णय प्रलंबित असताना नवीन सरकार येतच त्वरित निवडणूक घेतली. हा राज्यपालांचा दुजाभावच नाही का ?मध्यमवर्गाच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या देशाच्या स्वातंत्र्यलढ्याला देशातील प्रत्येक घडामोडीबद्दल आस्था होती. त्या काळात डिजिटल यंत्रणा नव्हती. पण तरीही लढ्याशी संबंधित बातम्यांचा प्रवास तेव्हा वाऱ्याच्या वेगाने झाला. चंपारण सत्याग्रह, जालियनवाला बाग हत्याकांड, पूर्ण स्वराजाचा ठराव, दांडीची पदयात्रा, भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांना फाशी, भारत छोडो आंदोलन आणि नेताजी बोस यांच्या नेतृत्वाखालील आझाद हिंदू सेनेच्या यशाने जनतेला ऊर्जा दिली. मध्यमवर्गाने स्वातंत्र्य चळवळीला दिलेली ऊर्जा आणि पुढे आणलेले नेतृत्व यांना त्यांच्या योगदानाचे श्रेय द्यायलाच हवे. तेव्हाचा तो मध्यमवर्ग आज कुठेच दिसत नाही. सामाजिक घडामोडींपासून अलिप्त होऊन तो आपापल्या पातळीवरचे जीवन जगतो आहे आणि त्याने स्वत:च स्वत:वर लादलेल्या एकाकीपणातून तो काही केल्या बाहेर यायला तयार नाही. सतत वाढत असलेली महागाई, करांचा वाढता भार, प्रचंड बेरोजगारी, २०२० मधले म्हणजेच कोविड काळातले अत्यंत वेदनादायक असे देशांतर्गत झालेले स्थलांतर, कोविडसंबंधित लाखो मृत्यू, पोलीस आणि तपास यंत्रणांचा अतिरेक, मानवी हक्कांची पायमल्ली, द्वेषयुक्त भाषणे, खोट्या बातम्या, मुस्लीम आणि ख्रिश्चनांना पद्धतशीर वगळले जाणे, घटनात्मक उल्लंघन, जाचक कायदे, संस्थात्मक ढाच्याचे महत्त्व कमी करणे, जनादेश नाकारणे, चीनबरोबरचा सीमा संघर्ष असे सगळे प्रश्न आ वासून उभे असताना मध्यमवर्गाला त्यांच्याशी काहीही देणेघेणे नाही. देशातील होणाऱ्या राजकीय घडामोडी किंवा नवीन घेतलेल्या निर्णयाबद्दल सर्वसामान्य माणूस कोणतीच प्रतिक्रिया व्यक्त होत करत नाही हे अनाकलनीय आहे. सर्वसामान्य मध्यमवर्गीय समाजाला सद्यस्थितीत चाललेले राजकारण पटलेले दिसत नाही. कारण जनता अशा राजकारणाला कंटाळली आहे. जनतेला अपेक्षा आहे ती विकासकामांची. परंतु विकास कामांपेक्षा जास्त राजकारणालाच भाव आहे असे दिसते.

# प्रो गोविंदा सीझन २ ची पूर्व पात्रता फेरी ठाणे, स्व. बाबुराव जिम्नॅस्टिक सेंटर येथे संपन्न

ठाणे - प्रो गोविंदा सीझन २ ची पूर्व पात्रता फेरीतील पहिली फेरी राज्यभरातील १६ संघांनी सहभागी होत मोठ्या उत्साहात प्रो गोविंदा लीगचे अध्यक्ष पुर्वेश सरनाईक, मुंबई टी २० लीग चेअरमन विहंग सरनाईक, डोम सिनेयुग कंपनीचे संचलाक अध्यक्ष मोहम्मद मोरानी, डोम एन्टरटेन्मेंटचे व्यवस्थापकीय संचालक मजहर नाडियावाला यांच्या प्रमुख उपस्थितीत ठाणे येथील स्व. बाबुराव जिम्नॅस्टिक सेंटर येथे संपन्न झाली.

एकूण ३२ संघ पूर्व पात्रता फेरीत सहभागी होणार आहेत. आगरेश्वर गोविंदा पथक, यश गोविंदा पथक, अजिंक्यतारा गोविंदा पथक, खोपटचा राजा गोविंदा पथक, मरीआई मेटपाडा गोविंदा पथक, बालवीर गोविंदा पथक, बाल उत्साही गोविंदा पथक, ओम ज्ञानदीप मंडळ, ओम साई माऊली गोविंदा पथक, हिंदु एकता दहीहंडी पथक, अष्टविनायक बालमित्र मंडळ, हिंदमाता गोविंदा पथक, शिवसाई क्रीडा मंडळ, साईराम गोविंदा पथक, आई चिखलदेवी गोविंदा प्रतिष्ठान, कोकण नगर गोविंदा पथक आदी पथकांची पूर्व पात्रता फेरी आज संपन्न झाली. उर्वरित १६ संघांची पूर्व पात्रता फेरी रविवारी दिनांक २८ जुलै, २०२४ रोजी होणार आहे. या फेरीतून अंतिम फेरीसाठी १६ संघ निवडण्यात येतील. अंतिम फेरी दि. १८ ऑगस्ट, २०२४ रोजी वरळीतील छडउख डोम येथे होणार आहे.

आज झालेल्या पूर्व पात्रता फेरीत मानवी मनोऱ्यांचा अद्भूतपूर्व खेळ अनुभवण्यास मिळला. गोविंदांच्या क्रीडा कौशल्याला जगासमोर आणणे व या खेळाला जागतिक प्रतिष्ठा मिळवून देणे




या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. मातीपासून ते मॅटपर्यंत दहीहंडीचा प्रवास पाहताना अतिशय समाधान वाटते, असे प्रो गोविंदा लीगचे अध्यक्ष पुर्वेश सरनाईक यांनी सांगितले. दहीहंडी उत्सव हा केवळ पारंपारिक खेळ म्हणून नव्हे तर या खेळाला राष्ट्रीय खेळ म्हणून ओळख निर्माण व्हावी यासाठी अशा प्रकारच्या कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. कबड्डी, क्रिकेटप्रमाणे या खेळाचे व्यावसायिकीकरण करून खेळाडूंना प्रोत्साहित करणे, खेळामधील सुरक्षितता वाढवणे तसेच प्रेक्षकांचा सहभाग वाढवणे हा या स्पर्धेमागील उद्देश आहे.


## नवी मुंबई महानगरपालिका

**अभियांत्रिकी विभाग**

**निविदा सुचना क्रमांक - नमुंमपा/शहर अभियंता/40/2024-25**

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकिय रक्कम (रू.) |
|---|---|---|
| 1 | बेलापूर विधानसभा क्षेत्रातील दिवाळे गाव बेलापूर येथील विरंगुळा केंद्रासमोर जोडरस्ता व इतर स्थापत्य कामे करणे. (आमदार निधी 2023-24) | 42,29,750/- |
| 2 | बेलापुर मतदार संघातील से.14 दिवाळे गाव येथे बहिरी देवाच्या भक्तांसाठी सभामंडप व शौचालय उभारणे (आमदार निधी 2023-24) | 42,10,251/- |
| 3 | बेलापूर मतदार संघातील आयकर कॉलनी, सीबीडी से.21 कॉक्रीटीकरणे व इतर स्थापत्य कामे करणे. (आमदार निधी 2023-24) | 29,32,671/- |
| 4 | बेलापुर विधानसभा क्षेत्रातील से.8 रमाबाई आंबेडकर नगर सी.बी.डी येथील वाहनतळा शेजारी सभामंडप अभारणे. (आमदार निधी 2023-24) | 25,29,711/- |

**निविदा पुस्तिका ई-टेंडरिंग (E-Tendering) संगणक प्रणालीच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर या संकेतस्थळावर दि.29/07/2024 रोजी प्राप्त होतील. निविदेचे सादरीकरण https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Online करण्याचे आहे. Online निविदा सादरीकरणाच्या प्रकियेतील कोणत्याही तांत्रिक अडचणीसाठी सदर संकेतस्थळावर दिलेल्या हेल्प डेस्क नंबरवर संपर्क करावे..**

**कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार मा.आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी राखून ठेवलेला आहे.**

सही/-

**शहर अभियंता**

**जा.क्र-नमुंमपा/जसं/जाहिरात/122/2024 नवी मुंबई महानगरपालिका**


# प्रसाद चिकित्सा, गणेशपुरी यांच्याद्वारे कर्करोग चिकित्सा शिबिर




वसई ( प्रतिनिधी ) - गणेशपुरी, व तानसा खोरे येथील नागरिकांच्या आणि आदिवासी पाड्यांच्या सर्वांगीण विकासासाठी तत्पर असणारी गुरुदेव सिद्ध पीठ प्रेरित, प्रसाद चिकित्सा धर्मादाय संस्था, गणेशपुरी यांचा ३० वा वर्धापन दिन २७ जुलै रोजी साजरा करण्यात आला. गुरुदेव सिद्धपीठ प्रेरित प्रसाद चिकित्सा धर्मादाय संस्था तीन दशके तानसा खोऱ्यातील ठाणे व पालघर जिल्हा वंचित व आर्थिक दुर्बल घटकांच्या सामाजिक व आर्थिक प्रगतीसाठी कार्य करीत आहे.

प्रसाद चिकित्साद्वारे आरोग्य, महिला सक्षमीकरण, कृषी उत्पन्न, स्वच्छ पाणी, साफसफाई, शिक्षण, पर्यावरण, कला व हस्तकला इत्यादी विकासकामे व समाज विकासाचे कार्य प्रसाद चिकित्सा करीत असते. संस्थेला तीस वर्षे पूर्ण झाली, या निमित्ताने विविध उपक्रम राबवून ३० वा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. यानिमित्ताने प्रसाद चिकित्सा हॉस्पिटल मध्ये धन्वंतरी पूजेचे सकाळी १० वा आयोजन करण्यात आले. खेडोपाड्यात महिला स्वत:च्या आरोग्याकडे लक्ष देत नाही, याचे मुख्य कारण हे आर्थिक कुचंबणा असते. पैशाअभावी आदिवासी महागातल्या आरोग्य टेस्ट करत नाही. त्यामुळे संभाव्य धोक्यांना त्यांना सामोरे जावे लागते. त्यात प्रामुख्याने गर्भपिशवीचा कर्करोग, स्तनांचा कर्करोग, याचे प्रमाण सध्या जास्त आढळत आहे. या सर्वांवर उपाय म्हणून प्रसाद चिकित्साने ३० व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून महिलांसाठी मोफत मॅमोग्राफिक कॅम्प तसेच पॅक स्मिअर व अद्ययावत एचपीव्ही स्क्रीनिंग कॅम्प, गर्भपिशवीच्या कर्करोगासाठी उपाय योजना याचे आयोजन केले होते. यावेळी रुग्णांवर मोफत उपचार करण्यात आले. कार्यक्रमासाठी रोटरी क्लब ऑफ कांदिवलीचे राज वर्मा, श्री मोदी, श्रीमती डॉ.नीता दोदवाड व मुंबई ऑन्कॉलॉजी सेंटरचे डॉ. प्रीतम कळसकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच पंचक्रोशीतील ग्रामपंचायतचे सरपंच, ग्रामविकास अधिकारी, ग्रामस्थ, पत्रकार, गुरुदेव सिद्ध पीठ व प्रसाद चिकित्सा चे सर्व अधिकारी पदाधिकारी यांची उपस्थिती आणि इतर प्रतिष्ठित नागरिक यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. यावेळी सर्वांनी प्रसाद चिकित्सा करीत असलेल्या कामाचे भरभरून कौतुक केले आणि असेच सेवाभावी कार्य आपल्याकडून नियमित होत राहो, अशा शुभेच्छा दिल्या, प्रसाद चिकित्सा गेली १० दशके अविरत समाज विकासाचे कार्य करीत आहे व ते पुढेही असेच अविरत राहील, असे मनोगत प्रसाद चिकित्साचे कार्यकारी व्यवस्थापक मिलिंद नरगुंद यांनी या कार्यक्रमा निमित्ताने व्यक्त केले.


## ठाणे महानगरपालिका, ठाणे

सार्वजनिक आरोग्य विभाग

निविदा सुचना

ठाणे महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागाकडील मध्यवर्ती औषधी भांडारा तर्फे महानगरपालिकेच्या रुग्णालये, दवाखाने, आरोग्य केंद्रे यांना दैनंदिन वापरासाठी लागणा-या लसी खरेदीसाठी ऑनलाइन निविदा मागविण्यात येत आहे. निविदा सूचना व निविदा प्रपत्र संकेतस्थळ https://mahatenders.gov.in वर दि.२९/०७/२०२४ ते दि.१२/०८/२०२४ रोजी १२.०० वाजेपर्यंत उपलब्ध होतील. दि.१२/०८/२०२४ रोजी १२.०० वाजेपर्यंत ऑनलाइन निविदा स्विकारण्यात येतील. दि.१२/०८/२०२४ रोजी १६.०० वाजता स्विकारलेल्या निविदा ऑनलाइन उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/आरोग्य/२०५/२०२४-२५ सही/-

दि:२६.०७.२०२४ उप-आयुक्त (आरोग्य)

**Pls visit our oficial web-site** ठाणे महानगरपालिका, ठाणे

**www.thanecity.gov.in**


# ठाणे शहर दैनिक पत्रकार संघातील सभासदांच्या पाल्यांचा सत्कार...



(छाया - मनोज सिंह)

ठाणे - ठाणे शहर दैनिक पत्रकार संघाच्या वतीने आयोजित दहावी आणि बारावी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या ठाणे शहर दैनिक पत्रकार संघातील सभासदांच्या पाल्यांचा सत्कार ठाणे महापालिका मुख्यालयातील कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात आयोजित करण्यात आला होता. सदर प्रसंगी ठाणे महापालिका आयुक्त . सौरभ राव यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला . त्याचबरोबर नवनिर्वाचित खासदार, नरेश म्हस्के, यांचा सत्कार संघाच्या वतीने करण्यात आला . यावेळी ठाणे महानगरपालिकेने वितरित केलेल्या सदनिकांची एनओसी, संघाचे ओळखपत्र आणि मेडिक्लेम कार्डाचे वितरण ही यावेळी करण्यात आले. सदर प्रसंगी ठाणे महानगर पालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी, ठाणे शहर दैनिक पत्रकार संघाचे अध्यक्ष आनंद कांबळे, कार्याध्यक्ष विकास काटे सरचिटणीस निलेश पानमंद,सहचिटणीस गणेश थोरात, खजिनदार विभव बिरवटकर,ज्येष्ठ पत्रकार मिलिंद बल्लाळ,ज्येष्ठ पत्रकार कैलास म्हापदी,पत्रकार संघाचे सदस्य अमर राजभर,सचिन देशमाने,अशोक गुप्ता,प्रफुल गांगुर्डे,पंकज रोडेकर,व इतर मान्यवर पदाधिकारी ठाणे शहर दैनिक पत्रकार संघाचे सर्व सभासद बंधू भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


## वसई विरार शहर महानगरपालिका

**प्रभाग समिती डी आचोळे, नालासोपारा (पु)**

**दुरध्वनी क्रं. ७२१९३७०००६/७२१९३७०००९**

जावक क्रं. वविशम/कवि/१२६०/२०२४-२०२५

दिनांक :- २६/०७/२०२४

**जाहिर नोटीस**

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ अन्वये जाहिर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती डी कार्यालय आचोळे नालासोपारा येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरणपरत्वे नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसाच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती डी कार्यालय आचोळे नालासोपारा येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करून महानगरपालिका दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

| अ. क्र. | विभाग | मालमत्ता क्रमांक | रिसीट नं. | ज्यांच्या नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्या किंवा कदरत्याचे नाव | खरीददाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १ | आचोळे-०९ | ५९३/३१ | १७६१ | सतैय्या शनीगारप्पू | राकेश मनोहर खाडये |
| २ | आचोळे-०९ | ४३१/९ | १७६३ | अनिल हरि राठोड | प्लावीया पीटर मोन्तेरो |
| ३ | आचोळे-०१ | २५/६० | १७६५ | भूमी डेव्हलपर्स | दिपीका जयेश कातकर |
| ४ | आचोळे-०७ | ८८/२७ | १७७० | रणछोड गांगी वाविया | अब्दुल रज्जाक शेख |
| ५ | आचोळे-०५ | १०३/९१ | १७७३ | रतन नरेंद्र कुरील | मनोज कुमार विश्वकर्मा |
| ६ | आचोळे-०४ | २३१/५६ | १७७६ | चंदुलाल बाबुभाई परमार व रिटा चंदुलाल परमार | स्नेहा अर्जुन परब |
| ७ | आचोळे-०७ | ९२/२२ | १७७८ | गिरीजेशकुमार तिवारी व पुनम गि तिवारी | धर्मेंद्र कुमार व उर्मिला देवी |
| ८ | आचोळे-०४ | २४०/३ | १७८० | अनिता हितेश रावळ | विजय कुमार बाबुराम जायसवाल |
| ९ | आचोळे-०१ | ९७/११ | १७८२ | एम व्ही. चांदिनी | पंकज जगन्नाथ पांडे व कुसुम पंकज पांडे |
| १० | आचोळे-९/१ | ५१३/१०५ | १७८४ | मुक्ताबेन भिमसी गाला व ललीत भीमसी गाला | ललीत भीमसी गाला |
| ११ | आचोळे-०२ | २९०/५ | १७८६ | प्रविण भाऊसाहेब हांडे | राहुल अशोक पटवा |
| १२ | आचोळे-१० | ४६१/७ | १७९० | श्री साई डेव्हलपर्स | ममता दिपनारायण सोनी |
| १३ | आचोळे-०२ | १५६/१२ | १७९२ | व्ही व्ही वै | श्रध्दा विशाल मांडवकर |
| १४ | आचोळे-१० | ३३०/१३ | १७९४ | अजित नारायण अंबेकर | रवी पुजारी व पार्वती रवि पुजारी |
| १५ | आचोळे-१० | ३८३/९३ | १७९७ | मज्जीद ए. सुबाल्य | सुर्यभान दलसिंगार चौरसिया व शोभावती दलसिंगार चौरसिया |
| १६ | आचोळे-०९ | ७८३/७ | १७९९ | सुर्य बाली यादव | संतोष लक्ष्मण चौधरी |
| १७ | आचोळे-१० | ४९०/७९ | १८०३ | मीना हिमांशु पाठक | उषा विजय यादव |
| १८ | आचोळे-०७ | ५८/२९ | १८०७ | लिटॅन मोंटु बैदया व ममता लिटॅन बैदया | प्रल्हाद तेजभान सिंह व सरोज प्रल्हाद सिंह |
| १९ | आचोळे-१० | ५६/१० | १८१० | डायगो डिसुजा | रुस्तुम हरी राठोड व प्रियंका रुस्तुम राठोड |
| २० | आचोळे-०८ | १५७/१६ | १८१२ | स्नेहा संदिप कालबे | अनिकेत चंद्रकांत कासार व चंद्रकला चंद्रकांत कासार |

शिक्का

सही/-
प्र. सहा. आयुक्त
प्रभाग समिती 'डी', आचोळे
वसई विरार शहर महानगरपालिका



## जाहीर नोटीस

आमचे अशील सुभाष नगर सागर को हाउसिंग सोसायटी मर्यादित, इमारत क्रमांक ४६, आचार्य मार्ग चेंबूर मुंबई ४०००७१ यांचे वतीने तमाम जनतेला कळवू इच्छितात की सदनिका क्रमांक १५६७, इमारत क्रमांक ४६ आचार्य मार्ग, चेंबूर मुंबई-४०००७१ , क्षेत्रफळ अंदाजे ३२३.१४ स्क्वेअर फुट (कार्पेट एरिया ), या सदनिकेच्या अनुषंगाने वितरित केलेला भागप्रमाणपत्र क्रमांक ३३, व भाग क्रमांक १ ते ५ (दोन्ही क्रमांक धरून) हे संस्थेच्या दप्तरा प्रमाणे श्री सदाशिव गणपत धुळे यांचे नावे होती (यापुढे सदर सदनिका असा उल्लेख आल्यास व वेगळा उल्लेख नसल्यास सदर सदनिका व सदर भाग प्रमाणपत्र समजावे) श्री सदाशिव गणपत धुळे यांचे दिनांक ०४/०२/१९९९ रोजी निधन झाले व तसेच त्यांच्या पत्नीचे म्हणजे श्रीमती सुमती सदाशिव धुळे यांचे दिनांक ०३/११/२०२२ रोजी निधन झाले त्यानंतर त्यांच्या वारसांनी म्हणजेच १) कुमारी भारती सदाशिव धुळे २) श्री महेश सदाशिव धुळे ३) सौ मधुरा विजय खोत पूर्वाश्रमीच्या कुमारी वंदना सदाशिव धुळे ४) सौ भावना उपेंद्र चेंदवणकर पूर्वाश्रमीच्या कुमारी सुरेखा सदाशिव धुळे यानी त्यांच्या सर्वांच्या नावे करण्यासाठी आमच्या अशिलांकडे अर्ज केला व आवश्यक ती कागदपत्रे देखील संस्थेकडे सादर केली आहेत तसेच त्यांनी त्यांच्या व्यतिरिक्त श्री सदाशिव गणपत धुळे आणि श्रीमती सुमती सदाशिव धुळे यांना अन्य कोणी वारस नसल्याचे प्रतिज्ञापत्र ही बनवले आहे.

तरी सदर सदनिकेच्या अनुषंगाने अन्य कोणी वारस असल्यास अथवा कुणाची हरकत असेल किंवा त्या वारसाहक्काच्या अनुषंगाने कोणत्या हरकती असतील अथवा सदर सदनिकेच्या अनुषंगाने कोणाचे कसले उदाहरणार्थ दान, तारण, गहाण, पोटगी इत्यादी किंवा त्यासंबंधी कुणाला काही लेखी म्हणणे सादर करायचे असेल तर ते कागदोपत्री पुराव्यांसह पुढील पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसाच्या आत सादर करावेत विहित मुदतीनंतर मिळालेल्या हरकती दाव्यांची दखल घेतली जाणार नाही तसेच सदर हक्क आपणहून स्वखुशीने सोडून दिले आहेत असे समजले जाईल व सदनिका हस्तांतरणाची कार्यवाही कायम करण्यात येईल. वर उल्लेख केलेल्या सदनिकेच्या अनुषंगाने काही संपर्क साधायचा असेल व काही हरकत घ्यायची असे तर त्यासाठी पुढे पत्ता दिला आहे. ही जाहीर नोटीस जनहितार्थ प्रसिद्ध केली.

सही
श्रीनिवास भा. घैसास
वकील उच्च न्यायालय

संपर्कासाठी चा पत्ता :
द्वारा घैसास अंड असोसिएट्स
२ ए, चंदन को-ऑपरेटिव हाऊसिंग सोसायटी मर्यादित
कीर्तिकर कंपाऊंड, नूरी बाबा दर्गा रोड,
मखमली तलावाजवळ, ठाणे (पश्चिम) ४०० ६०१.
दूरध्वनी क्रमांक ०२२ -२५४०१८१३, २५४०००६५९, २५४१६३३६
भ्रमणध्वनी क्रमांक ९८६९०८०७१४, ७०३९१३०६४१

शहाबाज गावात चार माळ्यांची इमारत कोसळली

# तिघांचा मृत्यू, एकजण अडकला

■ वेळीच बाहेर पडल्याने ५० बचावले
■ नवी मुंबई भाजपा जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांची घटनास्थळाला भेट ■ बचाव कार्याचा घेतला आढावा



नवी मुंबई : नवी मुंबई येथील शहाबाज गावात असलेली धोकादायक इंदिरा निवास ही चार मजली इमारत आज पहाटे ४.४५ च्या सुमारास कोसळली. इमारत कोसळत असल्याचे लक्षात आल्यावर इमारतीमधून वेळीच बाहेर पडल्याने ५० रहिवासी बचावले. यामध्ये ३७ प्रौढ आणि १३ बालकांच्या समावेश आहे. इमारतीच्या ढिगार्याखाली अडकलेल्या दोन रहिवाशांना बाहेर काढण्यात बचाव पथकाला यश आले आहे. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू असून त्यांची प्रकृती स्थिर आहे. मात्र जखमी झालेल्या एका रहिवाशाचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. एक जण अडकला असल्याची भीती वर्तवली जाते आहे. पंधरा वर्षांपूर्वी ही इमारत बांधली होती. एक रिक्षा चालक पहाटे या इमारती जवळून जात असताना इमारत कलंडली असल्याचे त्याच्या लक्षात आले. त्याने तातडीने इमारतीमधील रहिवाशांना याची सूचना दिली. रहिवाशांनी लगेचच इमारत खाली केली.

या दुर्घटनेची माहिती कळताच नवी मुंबई भाजपा जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांनी तातडीने दुर्घटनास्थळी भेट दिली आणि बचाव कार्याचा आढावा घेतला.

इमारत कोसळण्याची दुर्घटना गंभीर असून शहरातील सर्व धोकादायक इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट करून घेण्याची मागणी यावेळी जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांनी केली. आपल्या घराप्रती आपण भावनिक असतो त्याचबरोबर पर्यायी घर मिळेल की नाही हा विचार मनात असतो. मात्र धोकादायक इमारतींमधून राहणाऱ्या नागरिकांचा जीव महत्त्वाचा आहे. धोकादायक इमारती खाली करणे गरजेचे असल्याचे ते म्हणाले. त्यामुळे आपण भविष्यातील अशा दुर्घटना टाळू शकतो. दुर्घटनेत मृत्यूमुखी पडलेल्या रहिवाशाप्रती जिल्हाध्यक्ष नाईक यांनी दुःख व्यक्त केले आहे.

घटनास्थळी महापालिका आयुक्त कैलास शिंदे, अतिक्रमण उपायुक्त राहुल गेठे, वॉर्ड ऑफिसर शशिकांत तांडेल, उपअभियंता पंढरीनाथ चवडे तसेच स्थानिक एनआरआय पोलीस स्टेशनचे अधिकारी उपस्थित होते. एनडीआरएफ, पालिका आपत्ती व्यवस्थापन पथक आणि अग्निशमन दलाने बचाव कार्य केलं. सायंकाळी उशिरापर्यंत कोसळलेल्या इमारतीचा ढिगारा हटवण्याचे काम सुरू होतं.

# रस्ते दुरुस्तीची कामे सर्व प्राधिकरणाने युद्धपातळीवर पूर्ण करावीत : आयुक्त राव

ठाणे (गणेश भोईटे)

ठाणे शहरात सुरू असलेल्या रस्ते दुरूस्तीच्या कामाचा आढावा घेण्यासाठी महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी ठाणे शहरातील सर्व रस्त्यांची पाहणी केली. पावसामुळे शहरात ठिकठिकाणी पडलेले खड्डे हे स्वच्छ करुन ते मास्टिकच्या सहाय्याने युद्धपातळीवर दुरूस्त करण्याचे निर्देश आयुक्तांनी महापालिका, मेट्रो प्राधिकरण, सार्वजनिक बांधकाम विभाग, एमएमआरडीए या सर्व प्राधिकरणांच्या अधिकाऱ्यांना दिले.

या पाहणी दौऱ्यास अतिरिक्त आयुक्त २ प्रशांत रोडे, नगरअभियंता प्रशांत सोनग्रा, वाहतूक विभागाचे उपायुक्त विनयकुमार राठोड, एमएमआरडीए मेट्रोचे कोऑर्डिनेटर जयवंत ढाणे, कार्यकारी अभियंता शेवाळे, महाले, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी सुनील पाटील शाखा अभियंता परदेशी तसेच ठाणे महापालिकेचे उपनगर अभियंता सुधीर गायकवाड, कार्यकारी अभियंता संजय कदम, प्रकाश खडतरे, जवळकर आदी उपस्थित होते.

ठाणे महापालिका कार्यक्षेत्रात गेल्या काही दिवसांपासून पावसाची संततधार सुरू आहे, त्यामुळे रस्तयांवर ठिकठिकाणी खड्डे पडले असून ते तातडीने दुरूस्त करण्याची कार्यवाही करत असतानाच रस्तयावर उंचवटा राहणार नाही. रस्त्यांवरील खड्डे भरल्यानंतर सदर ठिकाणचा रस्ता हा एकसमान राहिल अशा पध्दतीने रस्त्याची दुरूस्ती करावी. तसेच रस्त्याच्या कडेला पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी असलेली पावसाळी गटारांची साफसफाई करण्यात यावी. तसेच गटारातील काढण्यात आलेला गाळ हा तेथेच न टाकता तो तातडीने उचलण्यात यावा अशाही सूचना यावेळी देण्यात आल्या.

ठाणे शहरातील विविध ठिकाणी असलेल्या जंक्शनवर ज्या ठिकाणी रस्ते खराब झाले आहेत त्या ठिकाणी पॅचवर्क करुन रस्ता सुस्थितीत होईल अशा पध्दतीने काम करण्याच्या सूचना आयुक्तांनी यावेळी दिल्या. माजिवडा जंक्शन ते नागला बंदर रस्त्यांची पाहणी देखील यावेळी करण्यात आली. रस्त्यावरील खड्ड्यामुळे वाहतूक कोंडी होत असून ती सोडविण्याच्या दृष्टीने रस्त्याची कामे जलदगतीने पूर्ण करावीत. एखादा छोटा खड्डा असेल तर तो मोठा होण्याआधीच तो भरण्यात यावा. घोडबंदर रोडवर सद्यस्थितीत मेट्रोचे काम सुरु नसून मेट्रोच्या कामाचे जे साहित्य रस्त्यावर ठेवण्यात आले आहे, त्याचा अडथळा वाहनचालकांना होणार नाही या दृष्टीने उपाययोजना करण्याच्या सूचना यावेळी आयुक्त सौरभ राव यांनी दिल्या.

## नवी मुंबईत अनधिकृत बांधकामांवर कारवाई

नवी मुंबई : महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५४ अन्वये नोटीस देऊनही संबंधितांनी नोटीशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामांविरोधात नवी मुंबई महानगरपालिका अतिक्रमण विभागामार्फत आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांचे निर्देशानुसार व अतिक्रमण विभागाचे उपआयुक्त डॉ. राहुल गेठे यांच्या नियंत्रणाखाली विविध विभागांत एकाच वेळी तोडक कारवाई धडकपणे राबविण्यात आली. यामध्ये बेलापूर विभागात शहाबाज गांव येथे महेश कुंभार यांचे ७ गाळे व घराचे अतिरिक्त बांधकाम हटविण्यात आले. तसेच रविंद्र वाघमारे यांचे ८ गाळेही तोडण्याची कारवाई सुरू करण्यात आली आहे.

तुर्भे विभागातील सेक्टर ५ सानपाडा येथील वासुदेव रामचंद्र पाटील यांच्या घर क्र. ५६८ येथील आर.सी.सी, बांधकामावर तोडक कारवाई करण्यात आलेली आहे.

कोपरखैरणे विभागातील दिलीप वसंत पाटील, घर क्र.१०२६, से.४ ए, कोपरखैरणे तसेच आत्माराम लक्ष्मण येडगे, घर क्र.१०३५, से.४ ए, कोपरखैरणे यांच्या अनधिकृत बांधकामांवरही धडक कारवाई करण्यात आलेली आहे.

घणसोली विभागातही जयश्री शाम शिंदे यांचे वाढीव ६ व्या मजल्याच्या बांधकामवर तोडक कारवाई करण्यात आली आहे. तसेच दत्तनगर, घणसोली येथील सोनु भोलेकुमार गुप्ता यांच्या आर.सी.सी कॉलम व प्लिन्थच्या अनधिकृत बांधकामावर तोडक हातोडा पडलेला आहे.

ऐरोली विभागात दिवागाव येथे मासळी मार्केटच्या मागील बाजूस सुरू असलेले सागरनाथ रामा मढवी, घर क्र.३०, यांचे आर.सी.सी इमारतीचे ३, ४ व ५ माळ्याच्या बांधकामावर धडक कारवाई करण्यात आलेली आहे.

## रेल्वे स्वच्छतागृह कंत्राटदाराकडून मुतारीसाठीही पैसे वसुली

ठाणे स्थानकातील प्रकार, संजय वाघुलेंकडून रेल्वेकडे तक्रार




ठाणे : ठाणे रेल्वे स्थानकातील स्वच्छतागृहातील कंत्राटदाराकडून दररोज हजारो प्रवाशांकडून मुतारीसाठी एक ते दोन रुपयांची आकारणी करून प्रवाशांची फसवणूक केली जात आहे. मोफत असलेल्या सुविधा न देता कंत्राटदाराकडून हजारो रुपयांची वसूली केली जात आहे. या प्रकाराविरोधात भाजपा ठाणे शहर जिल्हाध्यक्ष संजय वाघुले यांनी रेल्वे प्रशासनाकडे तक्रार केली असून, स्वच्छतागृहाबाहेर मुतारी मोफत असल्याची पत्रके लावली आहेत.

ठाणे रेल्वे स्टेशनमध्ये दररोज सुमारे साडेसहा लाखांहून अधिक प्रवाशांची वर्दळ आहे. रेल्वे प्रशासनाने प्रवाशांच्या सुविधेसाठी स्वच्छतागृहे उभारली आहेत. तर काही स्वच्छतागृहे पे ॲण्ड यूज तत्वावर आहेत. या स्वच्छतागृहांमध्ये मुतारीचा वापर मोफत आहे. परंतु, स्वच्छतागृहांच्या बहुसंख्य कंत्राटदारांकडून प्रत्येक प्रवाशाकडून एक ते दोन रुपये आकारले जात असल्याच्या तक्रारी होत्या. या तक्रारींची दखल घेऊन भाजपाचे ठाणे शहर जिल्हाध्यक्ष संजय वाघुले यांनी रेल्वे स्थानकातील स्वच्छतागृहांबाहेर रेल्वेची स्वच्छतागृहाची नियमावली असलेली पत्रके लावली. तसेच कंत्राटदाराच्या कर्मचाऱ्यांना प्रवाशांकडून मुतारीसाठी पैसे न घेण्याचा इशारा दिला. या संदर्भात ठाणे रेल्वे स्टेशनच्या व्यवस्थापकांकडेही तक्रार करण्यात आली आहे. तसेच कंत्राटदाराविरोधात कारवाई करण्याची मागणी केली आहे.


# कडोमपा क्षेत्रातील खड्डे भरण्याच्या कामांना जोरात सुरुवात

कल्याण : महापालिका क्षेत्रात चालू महिन्यात सरासरीपेक्षा जास्त पाऊस झाल्याने यंदा जवळपास दोन वेळा पुरपरिस्थिती निर्माण झाली,त्यामुळे रस्ते दुरुस्तीच्या कामात अडचणी निर्माण होत आहेत. आता उघडीप मिळाल्यानंतर सर्व प्रभागात खड्डे भरण्याच्या कामांना वेग देण्यात येत आहे.

या वर्षी कोल्ड मिक्स मटेरियल बरोबरच मास्टिक अस्फाल्ट वापरून २६ जुलै पासून कामांना सुरुवात केलेली आहे. या आठवड्यात प्रामुख्याने एफ केबिन, आनंद दिघे व प्रल्हाद शिंदे उड्डाणपूल, उल्हास नदीवरील पूल, गोविंदवाडी बायपास, डोंबिवलीत जोशी हायस्कूल, चोळे गांव हनुमान मंदीर चौक व टिळक चौक या ठिकाणी ही कामे करण्यात येतील. आधारवाडी जेल समोरील व डोंबिवली विभागातील श्री मलंग रस्ता, डोंबिवली (पूर्व व पश्चिम) येथे पाटकर रस्ता, संत ज्ञानेश्वर चौक, जिजाईनगर अशा ठिकाणी सतत खराब होणाऱ्या रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसविण्याचे काम सुरू आहे. गतवर्षी दुर्गाडी किल्ल्यासमोरील भागात बसविण्यात आलेल्या पेव्हर ब्लॉकमुळे यावर्षी सदर भाग खड्डे मुक्त राहिला आहे. महापालिकेच्या दहा प्रभागात एकूण १८ अभिकरणे नेमलेली असून त्यांच्यामार्फत सर्व कामे करण्यात येऊन वाहतुकीस त्रास होणार नाही, याची दक्षता घेण्यात येत आहे.

महापालिका क्षेत्रातील जवळपास २० टक्के म्हणजेच ८० किलोमीटरच्या आसपासचे रस्ते हे इतर प्राधिकरणाकडे आहेत अथवा या रस्त्यांवर त्यांच्याकडून कामे सुरू आहेत. यात महत्त्वाचा कल्याण शीळ रस्ता हा एम एस आर डी सी कडे, डोंबिवली मधील पेंढारकर कॉलेज रोड, घरडा सर्कल ते टाटा पावर, मानपाडा रस्त्याचा शेवटचा भाग, तसेच इतर ५ रस्ते ,हे रस्ते व शहाड येथील उड्डाणपूल हा सार्वजनिक बांधकाम विभागाकडे आहेत. काटई ते नेवाळी नाका हा बदलापूर पाईपलाईन रोड, व डोंबिवली औद्योगिक क्षेत्रातील रस्ते एमआयडीसी कडे आहे.

एम.एम.आर.डी.ए मार्फत कल्याण व डोंबिवली मध्ये जवळपास ५० रस्त्यांची कामे व औद्योगिक क्षेत्रातील निवासी भागातील रस्त्यांची कामे प्रगतीपथावर आहे. सदर रस्ते वाहतुकीस सुस्थितीत ठेवणे ही संबंधित प्राधिकरणाची जबाबदारी आहे, यासंदर्भात मान्सूनपूर्व आढावा बैठकीत तसेच दिनांक १८/७/२०२४ रोजीच्या आपत्कालीन आढावा बैठकीत महापालिका आयुक्त डॉ इंदु राणी जाखड यांनी संबंधित अभिकरणांना याबाबत सक्त सूचना दिलेल्या आहेत. या रस्त्यावरील तक्रारी सुद्धा महापालिकेकडे येत असतात व यासाठी संबंधित यंत्रणाशी संपर्क साधून आवश्यक दुरुस्तीच्या कामासाठी महापालिकेकडून पाठपुरावा करण्यात येत आहे अशी माहिती महापालिकेच्या शहर अभियंता अनिता परदेशी, यांनी दिली.



महापालिका मार्फत खड्ड्यांच्या तक्रारीसाठी दरवर्षीप्रमाणे यावर्षीही १८००- २३३-००४५ हा टोल फ्री नंबर ठेवलेला असून त्यावर नागरिकांनी आपल्या खड्ड्याविषयीच्या तक्रारी नोंदवाव्यात. महापालिकेकडून खड्डे भरण्याचे काम जलदगतीने सुरु असून, नागरीकांनी महापालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन महापालिकेमार्फत करण्यात येत आहे.

## मेट्रोचे गर्डर वाहून नेणाऱ्या वाहनाचा अपघात

ठाणे : घोडबंदर येथील जुना टोलनाका भागात मेट्रो मार्गिकेचे गर्डर वाहून नेणाऱ्या अतिअवजड वाहनाचा अपघात झाल्याने घोडबंदर मार्गावर मोठी वाहतूक कोंडी झाली आहे. या मार्गावर गायमुख घाट ते वाघबीळपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या आहेत. त्यामुळे ठाण्याहून बोरीवली, वसई, गुजरातच्या दिशेने वाहतूक करणाऱ्या चालकांचे आणि प्रवाशांचे हाल झाले आहेत. अवघ्या १५ ते २० मिनिटांच्या अंतरासाठी पाऊण तास लागत आहे. मध्यरात्रीपासून ही वाहतूक कोंडी सुरू आहे. घोडबंदर भागात मेट्रो मार्गिकेच्या निर्माणाचे काम सुरू आहे. रविवारी मध्यरात्री २.४५ वाजताच्या सुमारास ठाण्याहून घोडबंदरच्या दिशेने गर्डर वाहून नेणाऱ्या 'पूलर' या वाहनाला जुना टोलनाका येथे अपघात झाला. वाहन अतिअवजड असल्याने दोन्ही मार्गिकेवरील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती. घटनेची माहिती ठाणे वाहतूक पोलिसांना मिळाल्यानंतर पोलिसांनी दुसऱ्या एका पुलर वाहनाच्या मदतीने अपघातग्रस्त वाहन बाजूला काढण्याचे कार्य सुरू केले. सुमारे तीन तासानंतर हे वाहन रस्त्यावरून बाजूला करण्यात आले.

## मुस्लिम बांधवांच्याहस्ते आगरी कोळीबांधवांचा सन्मान



ठाणे: अनवर भाई कच्छी मुंब्रा शहर सेवाभावी फाऊंडेशनतर्फे आगरी कोळी / मुस्लिम एकता संमेलन १५ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६:३० वाजता कौसा तलावपाळी, नूर बाग हौल, मुंब्रा-कौसा पेट्रोल पंपसमोर होणार असून आगरी कोळी बांधवानी येऊन कार्यक्रमाची शोभा वाढवावी.

हा कार्यक्रम घेण्याचे उद्देश हे आहे की, आताची परिस्थिती देशाची अशी आहे की, प्रत्येक जागी जात-पात हिंदू मुस्लिम अशी भेद भावची परिस्थिती निर्माण झाली असून अशी परिस्थिती कळवा, मुंब्रा व शीळ ह्या परिसरामध्ये निर्माण कधीही झाली नाही व होऊ नये त्याकरीता हा कार्यक्रम राबवण्याचा उद्देश आहे. आमच्या ३ पिढ्या मुंब्रा, कळवा ह्या परिसरमध्ये गेल्या ४८ वर्षांपासून राहत आहे. पण आम्हाला आगरी कोळी समाजापासून कधीही मुस्लिम समाजाला त्रास देण्याचे काम झाले नाही. त्यापेक्षा आगरी कोळी समाजाने मुस्लिम समाजाबरोबर उभे राहून मुस्लिम समाजाचे सहकार्य करण्याचे काम केले आहे व गेल्या ४८ वर्षा पासून मुंब्रा, कळवा परिसरामध्ये छोट्या किंवा मोठ्या दंगली झाल्या नाही त्याचे आम्हाला मुंब्रा, कळवाकर म्हणून आम्हाला अभिमान आहे. गेली ४८ वर्ष आपण सर्वांनी एकतेची मिसाल कायम केली आहे.

महाराष्ट्रमध्ये बहुतेक जागी दंगली घडल्या असतील पण मुंब्रा, कळवामध्ये असे काही झाले नाही. त्याकरिता आम्ही हे कार्यक्रम करत असून आमचे बंधु आगरी कोळी बांधवाना सन्मानीत करण्याचे कार्यक्रम करत आहे. त्याकरिता आपणांस मानाची विनंती आहे की, आपण या कार्यक्रमात येऊन कार्यक्रमाची शोभा वाढवावी. ह्या कार्यक्रमात आगरी समाजातील खासदार, आमदार, नगरसेवक उद्योजक समाजसेवक ह्यांना सन्मानित करून सन्मानचिन्ह देण्याचे कार्यक्रम करत आहेत. जी पूर्वीची लोक व आमदार ह्यात नसतील त्यांच्या मुलांना किंवा त्यांच्या नातूना सन्मानित करण्यात येईल.

## पुणेकर नागरिकांच्या मदतीसाठी ठाणे महापालिकेचे पथक रवाना

**ठाणे : सतत सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे पुणे महानगरपालिका क्षेत्रातील अतिवृष्टीमधील बाधित नागरिकांना मदतकार्य करण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निर्देशानुसार महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणे महापालिकेच्या ठाणे आपत्ती दलाची टीम आज पहाटे पुण्याला रवाना करण्यात आली.**

पुणे येथील बाधिठाणे महापालिकेच्या वतीने पुणे येथे रवाना करण्यात आलेल्या पथकात ०२ उपअभियंता (यांत्रिकी), २ सुपरवायझर, ३ तांत्रिक कर्मचारी, ४ जेटींग वाहने ४ वाहनचालक, ८ ऑपरेटर/मदतनीस, १७७ सफाई कामगार, ०४ उपमुख्य स्वच्छता निरीक्षक, १२ स्वच्छता निरीक्षक, १० हवालदार, ०७ वाहनचालक आदींचा समावेश आहे.

त्याचबरोबर ८० खराटे झाडू, ८० ब्रश, ८० फावडे, ८० काटे/पंजे आदी साहित्याचा समावेश आहे. अतिवृष्टीमधील बाधितांना प्राथमिक औषधोपचार उपलब्ध व्हावे यासाठी वैद्यकीय किट, पुरेसा औषधसाठा, जठड पॅकेट, पाणी व बिस्कीट आदींचा समावेश आहे. तसेच नागरिकांना तातडीने उपचार मिळावेत यासाठी कार्डिअक ॲम्ब्युलन्स, वैद्यकीय अधिकारी डॉ. सुनिता सोनावणे, १ परिचारक व १ वाहनचालकाचा समावेश आहे.

अतिवृष्टीमुळे परिसरात साथीचे आजार पसरू नयेत यासाठी फायलेरियाची टीम परिवहनच्या बसमधून रवाना करण्यात आली असून यात ५ धुर फवारणी मशीन, दोन युटीलिटी वाहने ०१ इनोव्हा वाहन व औषधसाठ्यासह १० फवारणी पंपाचा समावेश आहे. या पथकासोबत २ स्वच्छता निरीक्षक, ०४ वाहनचालक, १९ फाइलेरिया असे एकूण २५७ अधिकारी कर्मचारी पुण्याला रवाना झाले आहेत. उपायुक्त जी.जी गोदेपुरे यांच्या नियंत्रणाखाली सदरचे पथक रवाना करण्यात आले आहे.

## पुणे पूरग्रस्तांना पनवेल महापालिकेचा मदतीचा हात




पनवेल : पुणे जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या पूरस्थितीमुळे पुणे शहर व आसपासच्या परिसरात निवासी भाग ,रस्ते व पूल, इतर अनेक ठिकाणी पाण्याच्या प्रवाहाबरोबर मोठ्या प्रमाणात गाळ , झाडे व कचरा वाहून आल्याने अस्वच्छता निर्माण झाली आहे. पनवेल महापालिकेच्यावतीने पुणे मनपाला पूरग्रस्त नागरिकांना मदतीसाठी आयुक्त मंगेश चितळे यांच्या निर्देशानुसार घन कचरा व आरोग्य विभागाच्यावतीने उपायुक्त डॉ.वैभव विधाते यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता पथक रवाना करण्यात आले आहे.

पुणे शहर आणि जिल्ह्यातील घाटमाथ्यावर गेल्या दोन तीन दिवसांपासून संततधार पाऊस सुरू होता. बुधवारी रात्री पावसाचा जोर वाढल्याने शहरातील संपूर्ण जनजीवन विस्कळीत झाले. शहरातील अनेक रस्त्यांना ओढ्यांचे स्वरूप प्राप्त झाले, तर अनेक घरांमध्ये पाणी शिरले, सोसायट्यांच्या पार्किंगमध्ये कमरेइतके पाणी साठले. त्याचवेळी खडकवासला धरणातून ३५ क्युसेसपर्यंत विसर्ग वाढविल्याने पुराच्या पाण्यात वाढ झाली.

सध्या पुराचे पाणी कमी झाले असले तरी सर्वत्र चिखल,झाडाच्या फांद्या, गाळाचे साम्राज्य पसरले आहे. याची तातडीने साफसफाई करणेकामी पुणे महापालिकेस सहकार्य करण्यासाठी महापालिकेचे उपायुक्त वैभव विधाते यांच्या बरोबर मुख्य आरोग्य निरीक्षक,६ स्वच्छता निरीक्षक, १० स्वच्छता पर्यवेक्षक , २५० मनुष्यबळ , ३० फवारणी कर्मचारी रवाना झाले आहेत. यांच्याबरोबर ३०० नग मास्क , ३०० नग हात मोजे, १० स्प्रे पंप, ५ फॉगिंग मशीन, १००० किलो जंतूनाशक पाउडर स्वच्छता करण्यासाठी पाठविण्यात आली आहे.

## भाजपा-संदीप नाईक प्रतिष्ठानच्या बेलापूरच्या महाआरोग्य शिबिराचा ६७० नागरिकांना लाभ

नवी मुंबई : नवी मुंबई भारतीय जनता पार्टी आणि संदीप नाईक प्रतिष्ठान यांच्या माध्यमातून सीबीडी-बेलापूर येथे आज आयोजित महाआरोग्य शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. ६७० नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला. नवी मुंबई भाजपा जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांच्या शुभहस्ते महा आरोग्य शिबिराचे उद्घाटन झाले.

याप्रसंगी नवी मुंबईचे माजी भाजपा जिल्हाध्यक्ष सी व्ही रेड्डी, भाजपा डॉक्टर सेलचे प्रमुख तसेच माजी स्थायी समिती सभापती डॉक्टर जयाजी नाथ, मंडळअध्यक्ष तथा माजी नगरसेवक अशोक गुरखे, माजी नगरसेविका राजश्री कातकरी, जगन्नाथ कोळी, बाळकृष्ण बंदरे, अशोक नरबागे, विनीत पालकर, ॲडवोकेट मंगला घरत, मोतीराम पालकर, सुभाष गायकवाड, विकास पालकर, समाजसेविका दिपाली घोलप आदी मान्यवर उपस्थित होते.

संघटनेमध्ये काम करत असताना सेवा आणि समर्पण ही भावना अंगी असायला हवी. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात मागील दहा वर्षात देशामध्ये आणि महाराष्ट्रात आरोग्य सेवांचा विस्तार झाल्याचे जिल्हाध्यक्ष नाईक यांनी सांगितले. नागरिकांनी आपल्या आरोग्याची वरचेवर तपासणी करायला हवी. एखाद्या व्याधीचे निदान वेळेवर झाल्यास उपचार करून ती बरी करता येते. अशा प्रकारच्या महाआरोग्य शिबिरातून आपल्याला आपल्या आरोग्याची स्थिती समजते. संतुलित आहार, नियमित व्यायाम आणि आरोग्य तपासणी आपले जीवन सदृढ ठेवते.



सुदृढ जीवन असेल तरच आयुष्याचा आनंद घेता येतो. सदृढ शरीरामध्ये सदृढ मन निवास करते. विविध परिसरामध्ये आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्याचे नियोजन असल्याचे जिल्हाध्यक्ष नाईक म्हणाले. नवी मुंबई शहर हे देशातील स्वच्छ शहरांपैकी एक शहर आहे. क्रीडा उपक्रम मोठ्या संख्येने होत असतात. उत्तम पायाभूत आणि आरोग्याच्या सुविधा उपलब्ध आहेत. त्यामुळे नवी मुंबईला हेल्दी शहर बनवण्याचा संकल्प घेतला असून सर्वांच्या साथीने तो पूर्ण होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

महाआरोग्य शिबिरात विविध प्रकारच्या रक्त चाचण्या, नेत्र तपासणी, मधुमेह तपासणी, बालकांची तपासणी, दंतचिकित्सा, जनरल हेल्थ चेकअप तज्ञ डॉक्टरांमार्फत विनामूल्य करण्यात आले. विनामूल्य औषधांचे वितरण देखील करण्यात आले. या शिबिरात वैद्यकीय सेवा देणाऱ्या अपोलो हॉस्पिटलच्या डॉक्टरांचा सन्मान करण्यात आला. त्याचबरोबर आर्टिस्ट व्हिलेजमध्ये पावसाच्या पाण्यात अडकलेल्यांची सुटका करणाऱ्यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

















'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर – डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई – ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम – ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक – चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१